# मानपत्र

## आदरणीय डॉ. वंदनाताई चक्रबर्ती

सस्नेह नमस्कार,

आपण स्वत: उच्चविद्याविभूषित आहात. आपला शैक्षणिक आलेख नेहमीच विशेष उल्लेखनीय राहिला आहे. अनेक शिष्यवृत्ती मिळवत आपण पदवी संपादन करताना सुवर्णपदक मानकरी देखील ठरला आहात. मराठी, हिंदी, इंग्रजी, बांग्ला व इतर अनेक भारतीय भाषांवर आपले प्रभुत्व आहे. तीन दशकांहून अधिक काळ आपण राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विद्यापीठातील उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांना मार्गदर्शन करीत आहात. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कृत प्रकल्प आपण यशस्वी केले आहेत. UGC आणि NAAC सारख्या संस्थांमार्फत आपण शिक्षणातील गुणवत्ता टिकविण्यासाठी व वाढविण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

आपण M. A. In Non-Formal Education & Development आणि Master of Social Work या दोन पदव्युत्तर अभ्यासक्रमांची निर्मिती देखील केली आहे. त्याचबरोबर सामाजिक बांधिलकी जपत आपण प्रौढ साक्षरता या भारत सरकारच्या अभियानात महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

आपण प्रौढ शिक्षण हा विषय हाताळत असताना अनेक समाजोपयोगी अभ्यासक्रम व त्यांचे प्रशिक्षण अनेक महाविद्यालये व सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने राबविले आहेत. संपूर्ण साक्षरता अभियान, साक्षरोत्तर उपक्रम आदी प्रकल्पांचे मूल्यमापन आपण केले आहे. साक्षरता, शिक्षण आणि सामाजिक जाणीव असलेला समाज लोकशाही समाजाच्या विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावू शकतो, हे ध्यानात घेऊन केंद्र शासनाने साक्षरतेच्या प्रसारासाठी परिश्रमपूर्वक प्रयत्न केले आहेत. भारत सरकारच्या धोरणांमध्ये आपण सुधारणा केल्या आहेत. अनेक राज्यांच्या तसेच राष्ट्रीय साक्षरता अभियानाच्या समित्यांना देखील आपण मोलाचे मार्गदर्शन केले आहे.

सामाजिक क्षेत्रात दिल्या जाणाऱ्या अनेक सन्माननीय व प्रतिष्ठेच्या पुरस्कारांच्या निवड समितीत (जसे की जानकीदेवी बजाज पुरस्कार, UNESCO, NLM Awards) आपण महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

आपल्या या कार्याची दखल घेऊन आपल्याला Fulbright Fellowship, Tagore Literacy Award, भास्कर कर्वे पुरस्कार आदी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या प्रकुलगुरु या पदावरून आपण निवृत्त झालात तरी शिक्षण क्षेत्रातील आपले काम अव्याहतपणे चालूच आहे. सामाजिक व शिक्षण क्षेत्रात उत्तुंग भरारी घेणाऱ्या आपण समाजासाठी आदर्श ठरल्या आहात. महिला दिन २०२० च्या निमित्ताने आपणास ईनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राईड आणि ज्ञान प्रबोधिनी निगडी, पालक महासंघ यांच्यावतीने **निरंजना** पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे.

दि. २९-०२-२०२०

ईनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राईड ज्ञान प्रबोधिनी निगडी, पालक महासंघ